11/45

सा.वि.कक्ष/ वरळी-शिवडी उन्नत मार्ग
2 एप्रिल, २०२६

विषय :- वरळी-शिवडी उन्नत मार्ग प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करणेबाबत.

संदर्भ :- १) मे. कोमल इंजिनिअरिंग वर्क्स यांचेकडील दि.१०/११/२०२० रोजीचे पत्र.
२) मे. कोमल इंजिनिअरिंग वर्क्स यांचेकडील दि.११/०१/२०२१ रोजीचे पत्र.
३) मे. कोमल इंजिरिअरिंग वर्क्स यांचेकडील दि.२३/०८/२०२१ रोजीचे पत्र.
४) श्री. नेहा प्रशांत भोसले व इतर १४८ प्रकल्पग्रस्तांचे स्वतंत्र अर्ज. + 1/45 to 295/5

कृपया उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्रे व टिपणीचे अवलोकन होणेस विनंती आहे.

वरळी-शिवडी उन्नत मार्ग प्रकल्पातील बाधित झोपडीधारकांचे सर्वेक्षण करणेकामी प्राधिकरणाने मे.कोमल इंजिनिअरिंग वर्क्स या संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर प्रकल्पातील शिवडी स्टेशन परिसरातील व इतर ठिकाणी असलेल्या बाधित झोपडीधारकांचे सर्वेक्षण करुन सर्वेक्षण संस्थेने संदर्भिय क्रमांक १ पत्रान्वये २९१ प्रकल्पग्रस्तांची सर्वेक्षण यादी दि.११/०१/२०२१ रोजी प्राधिकरणास सादर केलेली आहे. सर्वेक्षण संस्थेस वरळी-शिवडी उन्नत मार्ग प्रकल्पांतर्गत काही प्रकल्पग्रस्तांचे मुळ सर्वेक्षण करतेवेळी सर्वेक्षण करण्यास मनाई केल्यामुळे व काही सदनिका बंद असल्यामुळे सदर झोपडयांचे सर्वेक्षण करण्याचे प्रलंबित राहीले होते. त्या अनुषंगाने तत्कालीन मा. प्रमुख, सा.वि.क यांचेकडून दि.०६/०८/२०२१ रोजी सदर प्रकल्पाच्या आखणी मार्गामध्ये येणारे झोपडीधारकांचे सर्वेक्षण करणेकामीमे. कोमल इंजिनिअरिंग या सर्वेक्षण संस्थेस पत्र देण्यात आले.

सामाजिक विकास कक्षामार्फत सर्वेक्षण संस्थेस कळविल्यानुसार संदर्भ क्र.२ वरील पत्रान्वये मे.कोमल इंजिनिअरिंग वर्क्स या संस्थेने एकूण २७७ प्रकल्पग्रस्तांची सर्वेक्षण यादी व नकाशा जोडून या कार्यालयास नोंद घेणेकरीता कळविलेले आहे.तसेच संदर्भ क्र.३ वरील दि.२३/०८/२०२१ रोजीच्या पत्रान्वयेमे.कोमल इंजिनिअरिंग वर्क्स या संस्थेने एकूण २८ प्रकल्पग्रस्तांची सर्वेक्षण यादी व नकाशा जोडून या कार्यालयास कळविलेले आहे.अशा प्रकारे सदर प्रकल्पामध्ये एकूण ५९६ प्रकल्पग्रस्तांचे सर्वेक्षण करण्यात आले असल्याचे कार्यालयीन उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते. 295/5

सदर ५९६ प्रकल्पग्रस्तांपैकी आजतागायत एकूण २८६ प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आलेले आहे. उर्वरीत ३१० प्रकल्पग्रस्तांपैकी शिवडी स्टेशन परिसरातील एकात्मता फुले वसाहत व सेना नगर येथील १३० बाधित व पात्र प्रकल्पग्रस्तांचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५९ वी दि.२८/०३/२०२५ रोजी झालेल्या बैठकीमधील नियमानुसार चालु रेडी रेकनर २०२४-२०२५ च्या दराप्रमाणे निवासी वापराकरिता किमान २५ लाख व कमाल ४० लाख, अनिवासी वापराकरिता किमान क्षेत्रफळानुसार रक्कम व कमाल (२०.९०चौ.मी.) करीता ४२.९७ लाख इतकी रक्कम देण्याचे विहीत केल्यानुसार बाधित होणाऱ्या झोपडयांच्या बदल्यात आर्थिक मोबदला किंवा प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या सदनिका यापैकी एक पर्याय निवडून प्रकल्पग्रस्तांनी मागणी केलेल्या पर्यायानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त १३० पैकी १० झोपडीधारकांची बांधकामेसिमांकन रेषेच्या बाहेर असल्याने सद्यस्थितीत त्यांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. उर्वरीत १२० प्रकल्पग्रस्तांबाबत त्यांनी निवडलेल्या पर्यायानुसार त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे.

सदर प्रकल्पातील ५९६ प्रकल्पग्रस्तांपैकी ४०६ प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करण्यात आले असून उर्वरीत १८० प्रकल्पग्रस्तांपैकी १०९ प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन HDIL कुर्ला प्रिमियर येथील वसाहतीमधील इमारत क्र.२२ मध्ये E-विंग मधील २३, F-विंग मधील ८६ व G-विंग मधील ७६ अशा उपलब्ध असलेल्या एकूण १८५ सदनिकांपैकी E-विंग मधील २३ व F-विंग मधील ८६ अशा एकूण १०९ सदनिकांमध्ये प्रकल्पग्रस्तांचे व प्राधिकरणाच्या अन्य वसाहतीमध्ये उपलब्ध असलेल्या सदनिकांमध्ये उर्वरीत प्रकल्पग्रस्तांचे कायमस्वरुपी पुनर्वसन करणेबाबत मान्यता देणेस विनंती आहे.

मान्यतेस्तव सविनय सादर.

स.वि.अ. (श्री. घुले)

उपजिल्हाधिकारी (श्री. सुनिल शिंदे)

मा. अपर जिल्हाधिकारी (श्री. दावभट),
प्रमुख, वरळी-शिवडी प्रकल्प

मा. अति. महानगर आयुक्त-२ Submitted for approval.

मा. महानगर आयुक्त

08.04.26

Chief SDC

मान्यतेनुसार पुनर्वसन कार्यवाही करण्यात यावी.

09/04/26